भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त महानगरात नोकरी करणाऱ्या मागास-वर्गीय महिलांसाठी शासकीय वसतीगृह सुरु करणे.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
**शासन निर्णय क्रमांकः सान्यावि-२०१५/प्र.क्र.९८/बांधकामे**
कक्ष क्र.१४०, पहिला मजला, मंत्रालय विस्तार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग
मुंबई- ४०० ०३२
तारीख: ७ जानेवारी,२०१६

वाचा:-

१) मंत्रिमंडळ निर्णय दिनांक २२ सप्टेंबर,२०१५

२) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि.क्र.सान्यावि-२००५/प्र.क्र.१६३/बांधकामे, दि.९.१०.२०१५

३) आयुक्त,समाजकल्याण, पुणे यांचे पत्र दिनांक १८.१२.२०१५

प्रस्तावना:-

१. राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना महानगरांत शासकीय, निमशासकीय, खाजगी तसेच इतर प्राधिकरणात नोकरीच्या संधी प्राप्त होत आहेत. नोकरीच्या निमित्ताने अनेक मागासवर्गीय महिलांना मुंबई, पुणे व नागपूर, या महानगरांत यावे लागते. या महानगरांमध्ये कमी वेतनामध्ये परवडणारी व सुरक्षित अशी निवासस्थान उपलब्ध होत नसल्यामुळे अशा महानगरांमध्ये या महिलांची निवासाची गैरसोय होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली. या सर्व बाबींचा विचार करुन, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षा निमित्ताने प्रथमत: मुंबई, पुणे व नागपूर या तीन महानगरात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी प्रत्येकी एक वसतीगृह सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with OKEN Scanner

## शासन निर्णय:-

२. शासकीय, निमशासकीय, खाजगी इत्यादी प्राधिकरणात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलां-करिता मुंबई, पुणे व नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षा निमित्त प्रत्येकी एक शासकीय वसतीगृह सुरु करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरील वसतीगृहाच्या नवीन इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध होवुन, इमारतीचे बांधकाम पुर्ण होई पर्यत, मुंबई, पुणे व नागपूर येथे सदरील वसतीगृहे ही शासकीय इमारतीमध्ये अथवा शासनाच्या प्रचलित भाडेदराने, भाडे तत्वावरील इमारतीत सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदरील शासकीय वसतीगृहाच्या इमारतीत प्रवेशित महिलांना पुढीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील :-

(१) शासकीय वसतीगृहामध्ये नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येईल. या प्रवेशित महिलांना कॉट, आंथरुण, पांघरुण, इ. सोयी उपलब्ध करुन दिल्या जातील.

(२) सदर वसतीगृहाच्या इमारतीत तातडीच्या वैद्यकीय मदतीसाठी आवश्यकतेनुसार वैद्यकीय सुविधा पुरविली जाईल.

(३) शासकीय वसतीगृहामधील प्रवेशित महिलांना भेटावयास येणाऱ्या नातेवाईकांसाठी एक स्वतंत्र अभ्यंगत कक्ष असेल. मात्र, नातेवाईक तसेच पुरुष नातेवाईक यांना वसतीगृहाच्या इमारतीत निवासासाठी प्रतिबंध असेल.

(४) शासकीय वसतीगृहाच्या इमारत परिसरात प्रवेशित महिलांना वाहने ठेवण्याची सोय असेल.

(५) शासकीय वसतीगृहात ग्रंथालयाची सोय करण्यात येवुन त्या ठिकाणी वर्तमानपत्रे, पाक्षिके, मासिके इ. उपलब्ध करुन दिली जातील.

(६) शासकीय वसतीगृहात कॅरमबोर्ड, बुध्दीबळ व इतर इनडोअर क्रीडा साहित्य पुरविण्यात येईल.

५. महानगरात काम करणाऱ्या महिलांच्या प्रत्येक शासकीय वसतीगृहाचे व्यवस्थापन पाहण्यासाठी खालील कर्मचारीवृंदाची व्यवस्था केली जाईल.

| अ क्र | पदाचे नाव | पदसंख्या | वेतनश्रेणी / वेतन |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १ | रु ९३००-३४८००/- ग्रेड पे ४३०० |
| २ | कनिष्ठ लिपिक | १ | रु ९३००-३४८००/- ग्रेड पे १९०० |
| ३ | शिपाई | १ | बाहयस्तोत्राव्दारे घेण्यात येईल |
| ४ | पहारेकरी | ३ | बाहयस्तोत्राव्दारे घेण्यात येईल |
| ५ | सफाईगार | २ | बाहयस्तोत्राव्दारे घेण्यात येईल |
| | एकूण | ८ | |



Scanned with OKEN Scanner

६. मुंबई, पुणे व नागपूर येथील शासकीय वसतीगृहांसाठी वरीलप्रमाणे एकूण २४ पदांना मान्यता देण्यात येत असुन, त्याबाबतचे सविस्तर आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

७. मुंबई, पुणे व नागपूर येथील शासकीय वसतीगृहाच्या संबंधित महिला व्यवस्थापक यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. व्यवस्थापकाची कार्ये :-

(१) शासकीय वसतीगृहामधील सर्व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(२) आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामकाज हाताळणे.

(३) प्रवेशितांकरीता जाहिरात काढणे, प्रवेश अर्जाचे वाटप करणे, प्रवेश अर्ज स्वीकारणे, प्रवेशितांची यादी तयार करुन प्रस्ताव सादर करणे.

(४) वसतीगृहाच्या इमारतीचे भाडे सा.बां.वि.च्या सक्षम प्राधिकाऱ्याकडुन निश्चित करुन घेणे.

(५) प्रवेशितांची हजेरी सकाळ / संध्याकाळ घेणे.

(६) अधिनस्त कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन पाहणे.

(७) वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेले कामकाज हाताळणे.

९. कनिष्ठ लिपिकाची कार्ये :-

(१) वसतीगृहाच्या सर्व नोंद वह्या अद्ययावत ठेवणे.

(२) जडवस्तु संग्रह नोंदवही अद्ययावत ठेवणे.

(३) देयके तयार करणे.

(४) व्यवस्थापकांच्या कामात मदत करणे.

१०. वसतीगृहामधील प्रवेश नियमावली :-

(१) अर्जदार महिला महाराष्ट्राची रहिवासी असावी.

(२) अर्जदार महिला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अनाथ या वर्गवारीतील असावी.

(३) अर्जदार महिला ज्या ठिकाणी नोकरी करीत असेल, तेथील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले नेमणुकीच्या / बदलीच्या आदेशाची प्रत/ रुजू झाल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक असेल.

(४) अर्जदाराचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, पती, हे संबधित महानगरपालिका क्षेत्राच्या हददीत रहात नसावेत.



Scanned with OKEN Scanner

(५) अर्जदार नोकरी करणाऱ्या महिलेचे मासिक उत्पन्न हे रु.३०,०००/- पेक्षा जास्त नसावे. अशा महिलांचे मासिक उत्पन्न यापेक्षा जास्त झाल्यास त्यांना वसतीगृह सोडावे लागेल.

(६) काम करणाऱ्या महिला जास्तीत जास्त तीन वर्षापर्यंत या वसतीगृहात राहण्याची मुभा राहील. त्यानंतर त्यांना निवास्थान सोडणे अनिवार्य राहील.

(७) वसतीगृहात प्रवेश घेतेवेळी रु.५०००/-इतकी रक्कम अनामत रक्कम म्हणून वसतीगृहाच्या व्यवस्थापकांकडे जमा करावी लागेल.

११. वसतीगृहामधील प्रवेश नियमावली :-

११.१ महानगरात काम करणाऱ्या महिलांच्या वसतीगृहात प्रवेशासाठीची जाहिरात स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल व त्याची प्रत वसतीगृहाच्या दर्शनी भागावर तसेच संबधित सहायक आयुक्त व उपायुक्त, समाजकल्याण यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रदर्शित करण्यात येईल.

११.२ इच्छुक पात्र महिलांनी विहित नमुन्यातील अर्ज खालील कागदपत्रांसह संबंधित व्यवस्थापक यांच्याकडे मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

(१) अर्जदार ज्या ठिकाणी काम करीत आहे तेथील सक्षम अधिकाऱ्याचे दिलेले नेमणुकीचे / बदलीचे आदेश तसेच तेथे रुजू झाल्याबाबतचे प्रमाणपत्र,

(२) वेतनाचे प्रमाणपत्र,

(३) सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने विहीत नमुन्यात दिलेला वैदयकीय दाखला,

(४) दोन पासपोर्ट फोटो,

(५) ओळखपत्र ( पासपोर्ट / आधारकार्ड / संबधित प्राधिकरणाने दिलेले ओळखपत्र )

११.३ विहित मुदतीत प्राप्त झालेले अर्ज व्यवस्थापक संबंधित सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्याकडे अंतिम दिनांकानंतर आठ दिवसात सादर करतील. संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे सदरील अर्ज संबंधित प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे पुढील आठ दिवसात पाठवतील व त्यानंतर पुढील आठ दिवसांत प्रवेशाची यादी संबंधित प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून अंतिम केली जाईल.

११.४ सदर अंतिम यादी प्रसिध्द केल्यानंतर १५ दिवसात संबधित अर्जदाराने वसतीगृहात प्रवेश न घेतल्यास त्याचा वसतीगृहातील प्रवेश आपोआप रद्द होईल.



Scanned with OKEN Scanner

१२. सदरील मागासवर्गीय महिलांच्या वसतिगृहासाठी होणारा खर्च हा "मागणी क्र. एन-०३, मुख्य लेखाशीर्ष - २२२५ - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९- अनुसूचित जाती घटक योजना, ०२ - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे, (योजनांतर्गत -दत्तमत्त) लेखाशीर्ष - २२२५ डी ८२३" या लेखाशीर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीमधुन खर्ची टाकण्यात यावा.

१३. हा शासन निर्णय हा दिनांक २२.९.२०१५ रोजी मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून,त्याचा संकेताक २०१६०१०६१४०७०८१०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Haridas Wade

Digitally signed by Chandrakant Haridas Wade
DN: c=IN, o=SJ And SA, ou=Government Of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, cn=Chandrakant Haridas Wade
Date: 2016.01.11 12:59:03 +05'30'

(चंद्रकांत ह.वडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभव, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा / विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई/नागपूर
५. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
७. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे
८. आयुक्त, समाजकल्याण, पुणे
९. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचानालय, मंत्रालय, मुंबई,



Scanned with OKEN Scanner